# राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे : सन २०२२-२३
## मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना**

कृषि विकासाच्या प्रक्रियेमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन राज्यातील कृषि आणि कृषि संलग्न विभागामधील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने नागपूर येथे वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) दि. १ जुलै १९९२ पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे. दिनांक २९ मे १९९८ च्या शासन निर्णयान्वये कृषि विभागाची पुनर्रचना झाल्यानंतर वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर ही राज्यातील शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात आली आहे. खोपोली (रायगड), नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या पुर्वीच्या मृदसंधारण प्रशिक्षण संस्था नव्याने प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था म्हणून शिखर प्रशिक्षण संस्थेला जोडण्यात आल्या आहेत.

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील सर्व स्तरावर प्रशिक्षण देण्याची आवश्यकता विचारात घेवून सर्व स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने दिनांक २३.९.२०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण जाहिर केले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.३ नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व संवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांना प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राज्य विकास संस्था म्हणून यशदाकडे व विभागीय प्रशासकीय संस्था तसेच जिल्हा प्रशासकीय केंद्राकडे देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.२ नुसार विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधीत विभागावर सोपविण्यात आली आहे. त्यानुषंगाने नियमित प्रशिक्षणाकरिता विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना कृषि प्रक्रिया व पणन या क्षेत्रातील नाविन्यपुर्ण बाबी तसेच विविध प्रकल्प, अभियान, नविन योजना व योजनेमध्ये झालेले बदल याबाबत तसेच माहिती व कौशल्य यामध्ये वाढ करण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. त्याकरिता सन २०२२-२३ मध्ये रु.५००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**अ) उद्देश :**

१) विविध योजना / कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी नवनियुक्त कृषि सेवकांना प्रशिक्षण देणे.
२) कृषि विभागाचे कामकाज, सेवाशर्ती, प्रशासनिक, आस्थापना व वित्तीय बाबी इ.माहिती नवनियुक्त कृषि सेवकांना देणे.
३) विभागाचे धोरण व कार्यपध्दती याची माहिती नवनियुक्त कृषि सेवकांना देणे.
४) आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार शेतक-यांपर्यत पोहोचविण्यासाठी क्षमता विकसित करणे.
५) कृषिप्रक्रिया व पणन या क्षेत्रातील नावीन्यपूर्ण बाबींची प्रशिक्षणार्थीना माहिती करून देणे.
६) विविध प्रकल्प,अभियान यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यवस्थापकीय कौशल्य विकसित करणे.

**ब) आर्थिक तरतूद**

सन २०२२-२३ मध्ये नवनियुक्त कृषि सेवक पायाभुत प्रशिक्षणासाठी **रु ५१४.०६ लाख** इतका कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर निधीच्या अधिन राहुन कार्यक्रम राबवावा.

तक्ता : **विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचा तपशील**

| अ क्र | बाब | एकूण प्रस्तावित तरतूद (रुपये लाखात) | प्रशिक्षणाचे मापदंड | भौतिक लक्ष (प्रशिक्षण वर्गाची संख्या) |
|---|---|---|---|---|
| १ | नवनियुक्त कृषि सेवकांसाठी प्रशिक्षण (रामेती स्तरावर) | ५१४.०६ | **रु १५००/- प्रति दिन प्रती प्रशिक्षणार्थी** (४५ दिवसांचे प्रशिक्षण) | २० **बॅचेस** (३३६५१ **मनुष्यदिवस**) |
| **टिप** – उक्त प्रशिक्षण वर्गामध्ये सन २०१९-२० मध्ये कोवीड-१९ मुळे अपुर्ण राहीलेल्या **३** प्रशिक्षण वर्गाचा समावेश आहे. त्यामध्ये रामेती नागपूर १ बॅच (३९ दिवस), रामेती अमरावती १ बॅच (२४ दिवस) व रामेती नाशिक १ बॅच (१५ दिवस) चा समावेश आहे. | | | | |

१) **वनामती, नागपूर/रामेती स्तरावरील अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण :**

सन २०२२-२३ मध्ये नवनियुक्त कृषि सेवक पायाभुत प्रशिक्षणासाठी वनामती नागपूर यांचे पत्र क्र.१३६३ दिनांक १९.४.२०२२ अन्वये प्रशिक्षण कॅलेंडर आयुक्तालयास सादर केले होते. त्याप्रमाणे रामेती (सर्व) यांनी नियोजनाप्रमाणे कार्यक्रम राबवुन तसा अहवाल कृषि आयुक्तालयास व वनामती, नागपूर यांना सादर करावा व त्यास अधिन राहुन सर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची काळजी घ्यावी.

रामेती प्रशिक्षण संस्था ज्या विभागात स्थापन झाली आहे, त्या विभागाच्या कार्यक्षेत्रात असलेले अधिकारी/कर्मचारी यांना संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्या प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन करावयाचे आहे. **औरंगाबाद येथील प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणार्थी पाठवितांना विभागीय कृषि सहसंचालक औरंगाबाद व लातूर यांनी समप्रमाणात अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षणास पाठवावेत.** प्रशिक्षणास अधिकारी /कर्मचारी अनुपस्थित राहिल्यास शासन निर्णय आकृवि-१२०५/प्र.क्र.३७/१५-अे दि. १३/१/२००६ नुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच दंडात्मक कारवाईपोटी वसूल करण्यात आलेली रक्कम **उत्पन्न लेखाशिर्षाखाली** (Reciept Head) जमा करण्यात यावी.

सन २०२२-२३ मधील प्रशिक्षण कार्यक्रम राज्यस्तरावरील मा. संचालक, वनामती, नागपूर व प्राचार्य, रामेती संस्था (सर्व) तसेच विभागीय कृषि सहसंचालक (सर्व विभाग) यांचे सहमतीने तयार करण्यात आला आहे. वनामती, नागपूर संस्थेने प्रत्येक प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गाचे वार्षिक वेळापत्रक संबंधित विभागांना पाठवावे. तसेच या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये संस्थानिहाय / महिनानिहाय घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा त्यावर झालेल्या खर्चाच्या माहितीसह सविस्तर अहवाल शासनास व कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा. आपणांस उपलब्ध करून दिलेल्या निधीतुन कार्यक्रम राबविण्यात यावा.

**प्रशिक्षणासंबंधी अंमलबजावणी करण्यास पुढीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत**

१. प्रत्येक प्रशिक्षण संस्थेने त्या त्या विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक यांचे सहमतीने तयार करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन व अंमलबजावणी करावी.
२. प्रशिक्षण कार्यक्रम योग्यरीतीने राबविण्याकरीता व्याख्याते म्हणून कृषि विभागातील प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी, कृषि विद्यापीठाकडील शास्त्रज्ञ, खाजगी नामांकित संस्थांमधील तज्ञ मार्गदर्शक, प्रगतीशील शेतकरी यांना पाचारण करण्यात यावे व नियमानुसार त्यांना मानधन देण्यात यावे.
३. नवनियुक्त कृषि सेवकांच्या पायाभुत तांत्रिक प्रशिक्षणासाठी "प्रशिक्षण अभ्यासक्रम पुस्तिका" (Training Module) सर्व रामेतींच्या मदतीने वनामती स्तरावर तयार करावे. यात ४५ दिवसात दिवस-निहाय घ्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा थोडक्यात तपशिल असलेली एक पुस्तीका

**प्रशिक्षक मार्गदर्शक पुस्तीका** (Facilitator Guide Book) व सविस्तर माहितीची दुसरी पुस्तीका **प्रशिक्षण माहिती पुस्तीका** (Resource Manual)तयार करावी. (उदा. स्मार्ट प्रकल्पांतर्गत Comprehensive Training Manual)

४. ४५ दिवसांच्या पायाभुत प्रशिक्षणाव्यतिरिक्त उजळणी प्रशिक्षणासाठीही Training Module तयार करावेत.

५. प्रशिक्षण सत्रादरम्यान प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला एक विषय देवून सर्वेक्षणासह प्रकल्प अहवाल तयार करुन घेवून त्याचे मुल्यांकन करावे.

६. प्रशिक्षणामध्ये विषयानुरूप आवश्यक त्या बाबींसाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात यावे.

७. ज्या विषयावर व्याख्यान द्यावयाचे आहे, त्यात नेमक्या कोणत्या बाबींचा अंतर्भाव असावा, याविषयी संबंधित प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी व्याख्यात्यांशी संपर्कात राहून त्यांना पुर्वकल्पना द्यावी. कोणत्याही प्रकारे प्रशिक्षण वर्गात खंड पडणार नाही याची दक्षता प्राचार्य, रामेती (सर्व) यांनी घ्यावी.

८. नवनियुक्त कृषी सेवकांच्या पायाभूत प्रशिक्षणाबाबत मा.आयुक्त (कृषि) तसेच सर्व कृषि संचालक यांना अवगत करण्यात यावे व प्रशिक्षणामध्ये त्यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

९. कृषी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना, निर्यातदारांना, अनुभवी सेवानिवृत्त असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील आमंत्रित करण्यात यावे किंवा त्यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

१०. शासकीय सेवेमध्ये पायाभूत प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याने या प्रशिक्षणाचा नियमित आढावा होणे आवश्यक आहे तसेच यामध्ये विविध विषयावरील तज्ञ, Motivational Speaker, Innovative Farmers यांनाही आमंत्रित करावे.

११. प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेमध्ये नवनियुक्त कृषि सेवकांना प्रशिक्षण देण्यात येईल. संबंधित प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी रामेती संस्था ज्या विभागात आहे त्या विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक यांना प्रशिक्षण कार्यक्रमाची आगाऊ सुचना देवून प्रशिक्षणासाठी कर्मचा-यांची नामांकने पाठविणेबाबत किमान दोन महिने अगोदर कळवावे. संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी संस्थेच्या मागणीप्रमाणे किमान एक महिना अगोदर प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणाचे आदेश मिळतील या बेताने प्रशिक्षणाचे आदेश निर्गमित करावेत व त्याची प्रत संबंधित रामेती संस्था व कृषि आयुक्तालयास पाठवावी.

१२. **विभागीय कृषि सहसंचालक यांच्या व्यतिरिक्त जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रशिक्षण आदेश काढू नयेत किंवा त्यामध्ये बदल करू नयेत.**

१३. **विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमास अनुपस्थितीबाबत दिनांक १३ जानेवारी २००६ चे शासन परिपत्रकान्वये व मा.आयुक्त (कृषि) यांचे दिनांक २८.११.२०१९ रोजीचे परिपत्रान्वये सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत.**

१४. **प्रशिक्षण वर्गास अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी रामेती स्तरावरून विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास व कृषि आयुक्तालयास दरमहा सादर करावी. त्यामध्ये कर्मचारी अनुपस्थित कालावधी व वसुल करावयाची रक्कम याचा समावेश करावा.**

१५. **जे कर्मचारी विभागीय कृषि सहसंचालक यांची मान्यता न घेता प्रशिक्षणास अनुपस्थित राहतील, अशा अधिकारी /कर्मचाऱ्यांकडून अनुपस्थित कालावधीचे प्रती प्रशिक्षणार्थी होणाऱ्या एकूण खर्चाच्या १० टक्के रक्कम वसूल करून ती शासन जमा करावी व त्याप्रमाणे कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सर्व विभागीय कृषि सहसंचालक यांनी दरमहा ५ तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करावा.**

वनामती, नागपूर /रामेती (सर्व) येथील प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षणार्थींचा उपस्थिती अहवाल वनामती, नागपूर यांनी खालील प्रपत्रात कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**प्रपत्र-१**

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षण कालावधी | एकुण दिवस | प्रशिक्षणार्थी संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विकृससं यांचे आदेशा प्रमाणे | रामेतीच्या कार्यमुक्त अहवाला प्रमाणे | अनुपस्थित प्रशिक्षणार्थी | | |
| | | | | | | परवानगी घेतलेले | विना परवानगी गैरहजर | दंडात्मक कार्यवाहीस पात्र |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

**दंडात्मक कार्यवाहीस प्राप्त प्रशिक्षणार्थीकडून वसूल केलेली रक्कम विभागीय कृषि सहसंचालक यांनी शासनाकडे जमा केल्याचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये आयुक्तालयास सादर करावा.**

**प्रपत्र -२**

| अ क्र | विभागाचे नांव | प्रशिक्षणा चा विषय | प्रशिक्षण कालावधी | एकुण दिवस | दंडात्मक कार्यवाहीस पात्र प्रशिक्षणार्थी संख्या | दंडात्मक कार्यवाही करीता वसूल करावयाची रक्कम (रु.) | वसुलीपोटी शासनाकडे भरणा केलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

१६. सर्व प्रादेशिक कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणाकरीता प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन **रुपये १५००/-** याप्रमाणे मापदंड राहील याची नोंद घ्यावी.तसेच झालेल्या अनुदान खर्चाचा अहवाल, निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) तसेच सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (Audited U.C.) तात्काळ कृषि आयुक्तालयास सादर करावे.

१७. प्रशिक्षण वर्गाकरीता लागणारा निधी कृषि आयुक्तालयस्तरावरुन वनामती, नागपूर या संस्थेकडे वर्ग करण्यात येणार असून त्यांनी रामेती संस्थांच्या मागणीप्रमाणे निधी त्या त्या प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थांकडे वर्ग करावयाचा आहे. रामेती संस्थांनी वनामती संस्थेस मागणी केलेल्या निधीबाबत कृषि आयुक्तालयास अवगत करावे.

१८. या योजनेतील रामेती स्तरावरील प्रशिक्षणाकरीता दर्शविलेला निधी एकत्रितरित्या वनामती, नागपूरकडे वर्ग करण्यात येत असल्याने सदरचा निधी खर्च करण्याबाबत अवलंब करावयाच्या कार्यपध्दती विषयी शिखर संस्थेने त्यांच्या स्तरावरुन मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्तालयाच्या सहमतीने इतर सात रामेती संस्थांना निर्गमित कराव्यात व त्याची एक प्रत माहितीसाठी या विभागास पाठवावी. उपलब्ध करून देण्यात आलेले अनुदान माहे मार्च २०२३ पुर्वी खर्च होईल याची सर्व संबंधित यंत्रणानी काळजी घ्यावी. सदर योजनेतील रामेती संस्थांना वर्ग केलेल्या अनुदानाच्या आर्थिक बाबींचा हिशोब वनामती संस्थेने त्यांचेस्तरावर ठेवावा. तसेच बाबनिहाय आर्थिक व भौतिक लक्ष साध्य अहवाल कृषि आयुक्तालयास पाठवावा.

**१९.** विभाग स्तरावरून प्रशिक्षणार्थींची नावे रामेती संस्थांना कळविताना उपरोक्त नमूद केलेल्या सर्व तपशिलासह (नांव/ पदनाम/ मुख्यालय/ भ्रमणध्वनी क्रमांक/ वर्गवारी (SC/ST/ Others/ Male / Female इत्यादी ) कळविण्याबाबत संबंधित अधिकारी/ प्रशासन अधिकारी यांना विभागीय कृषि सहसंचालक यांचे स्तरावरून आवश्यक त्या सूचना तात्काळ देण्यात याव्यात. त्यानुसार वनामती, नागपूर यांनी एकत्रित मासिक प्रगती अहवाल पाठवावा.

वनामती, नागपूर यांनी निधी उपलब्ध होताच संस्थानिहाय आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण वर्ग व संस्थानिहाय वितरीत केलेल्या अनुदानाची माहिती कृषि आयुक्तालयास सत्वर पाठवावी.

**आहरण व संवितरण :-**

या योजनेकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीसंदर्भात मा.आयुक्त,कृषि यांना नियंत्रण अधिकारी तसेच सहाय्यक संचालक (लेखा - १) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तद्अनुषंगाने या योजनेसाठी प्राप्त होणारे अनुदान संचालक, आत्मा यांचेकडून वनामती, नागपूर यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरित करण्यात येईल.

सन २०२२-२३ मध्ये नवनियुक्त कृषि सेवकांच्या तांत्रिक पायाभुत प्रशिक्षणासाठी प्रस्तावित केलेल्या रु.५१४.०६ लक्ष निधीच्या कार्यक्रमास अनुसरून या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**कृषि संचालक (आत्मा)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

----------------

जा.क्र/कृआ/प्रशिक्षण/प्र.क्र.३/वि.प्र.५/२७५८/२०२२
कृषि आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य,पुणे-५
दिनांक - जुलै २०२२
८ ऑगस्ट २०२२

**प्रति,**

१) मा. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२) विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
४) प्राचार्य , विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (सर्व )

**प्रत –**

१) मा. प्रधान सचिव (कृषी) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) कृषि संचालक (सर्व) कृषि आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
३) कृषि सहसंचालक, आस्थापना, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कृषि उपसंचालक, मा. आयुक्त कृषी कक्ष, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे यांना माहितीसाठी.

**कृषि संचालक (आत्मा)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**